पोलीस अधीक्षक, कार्यालय गडचिरोली
जनसंपर्क शाखा
P.R.O Office, Gadchiroli
**Phone No.** 07132223142 **Address**: SP Office,Gadchiroli
**E-mail** : prospoffice.gadchiroli@gmail.com

# वार्तापत्र

दिनांक- २३/१०/२०२०

# पत्नीस जीवानिशी ठार मारणाऱ्या आरोपीस जन्मठेप व ५०००/- रु. दंडाची शिक्षा

## • मा. जिल्हा व सत्र न्यायालय यांचा महत्वपुर्ण निकाल

भामरागड तालुक्यातील मौजा कोसफुंडी या गावातील आरोपी नामे लालु विज्या कोवासी वय ४० वर्ष याने दिनांक १६/०७/२०१९ रोजी आपले पत्नीला शेतावर असतांना भांडण करुन सायंकाळी ४.०० वाजताचे दरम्यान चाकुने भोसकुन जिवानिशी ठार केले होते. याची माहीती फिर्यादी नामे विनोद लालु कोवासी यास विनोदच्या चार वर्षाच्या मुलीने सांगितल्यावरुन आरोपी विरुध्द पोस्टे भामरागड येथे अप. क्र. २६/२०१९ भादंवि कलम ३०२ अन्वये गुन्हा नोंद करुन तपासात घेण्यात आला होता.

सदर गुन्हयाचा तपास पोउपनि समीर शिवराम दाभाडे पोमके ताडगाव यांनी पुर्ण करुन आरोपी विरुध्द मा. जिल्हा व सत्र न्यायालय गडचिरोली येथे दोषारोपपत्र दाखल केले होते. से.के.क्र १३३/२०१९ अन्वये केस मा. जिल्हा व सत्र न्यायालयात खटला चालविण्यात आला. मा. न्यायालयाने फिर्यादी व साक्षीदारांचे बयाण नोंदवुन आरोपीविरुध्द सबळ पुरावे मिळुन आल्याने व सरकारी वकीलांचा युक्तिवाद ग्राहय धरुन मा. जिल्हा व सत्र न्यायाधिश यांनी आरोपीस क्र.३०२ भादंविमध्ये जन्मठेप व ५०००/- रुपये दंडाची शिक्षा दिनांक- २३/१०/२०१९ रोजी सुनावण्यात आली.

गडचिरोली पोलीस दलाचे वतीने सदर गुन्हयाचा तपास पोउपनि समिर दाभाडे पोमके ताडगाव यांनी केला तर सरकारी पक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. एन. एम. भांडेकर यांनी बाजु मांडली कोर्ट पैरवी म्हणुन पोनि. प्रकाश तुनकलवार यांनी काम पाहीले. मा. पोलीस अधीक्षक श्री अंकित गोयल सा़ो. यांनी गुन्हयाचा कसुन तपास करणारे तपासी अधिकारी श्री. समीर दाभाडे व त्यांच्या संपुर्ण टीमचे अभिनंदन केले आहे.